**ठळक बातम्या**

- स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणाऱ्या वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात विक्रमी ६४ पूर्णांक ६६ शतांश टक्के मतदान, दुसऱ्या टप्प्याच्या प्रचाराला वेग

- शैक्षणिक संस्था, रुग्णालयं तसंच सार्वजनिक वापराच्या जागांवर भटक्या कुत्र्यांच्या प्रतिबंधासाठी कुंपण घालण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

- भारतीय हॉकीच्या गौरवशाली शतकपूर्तीनिमित्त आजपासून देशभरात विविध कार्यक्रम

**आणि**

- एनएसडब्ल्यू खुल्या स्क्वॉश स्पर्धेत भारताच्या रथिका सुथंतिरा सीलन हिचा उपांत्य फेरीत प्रवेश

**<><><><>**

स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणाऱ्या वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाची आज सुरुवात झाली. हे गीत बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी दीडशे वर्षांपूर्वी लिहिलं होतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली इथं ‘वंदे मातरम्’ शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचं उद्घाटन केलं. ‘वंदे मातरम्’ हा एक मंत्र आहे, एक ऊर्जा आहे, एक स्वप्न आणि एक संकल्प आहे, असं प्रधानमंत्र्यांनी या कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितलं. हे

गीत म्हणजे भारतमातेप्रति भक्ती आणि आदर व्यक्त करणारा भाव आहे, जो आपल्याला इतिहासाशी जोडतो, वर्तमानात आत्मविश्वास निर्माण करतो आणि भविष्यासाठी नवसंजीवनी देतो, असंही ते म्हणाले.

**होल्ड-- बाईट - प्रधानमंत्री**

'वंदे मातरम्' एकत्रितपणे गाणं हा शब्दांच्या पलीकडचा, हृदयाला स्पर्श करणारा अनुभव असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी या गीताद्वारे स्वतंत्र, एकसंध आणि समृद्ध भारताचा नारा दिला होता, असं ते म्हणाले. या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांनी एक विशेष टपाल तिकीट आणि नाणं प्रकाशित केलं. तसंच 'vandemataram150.in' हे विशेष पोर्टलही सुरू केलं. वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त देशभरात वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रीय गीत वंदे मातरमच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त अभिवादन केलं आहे. स्वातंत्र्यसमराच्या काळात ब्रिटिशांच्या विरोधात सन्यांशांनी पुकारलेल्या बंडाच्या वेळी बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी या अमर गीताची रचना केली होती, असं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. हे गीत आजही सर्व भारतीयांना एका सूत्रात बांधून ठेवण्याचं काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं. यानिमित्तानं सर्व नागरिकांनी भारतमातेच्या समृद्धीसाठी काम करण्याचा संकल्प करावा, असं आवाहन त्यांनी केलं.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनीही वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताला अभिवादन केलं. हे राष्ट्र भावना जागवणारं आणि पिढ्यांना प्रेरणा

देणारं शाश्वत गीत आहे, असं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रम होणार आहेत. या निमित्त संशोधक आणि संगीत संग्राहक मिलिंद सबनीस यांची विशेष मुलाखत आज रात्री ८ वाजता दिल्लीवरून प्रसारित होणार आहे. मुंबईसह राज्यातली सर्व केंद्रं ही मुलाखत सहक्षेपित करतील. त्यामुळे रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं मराठी राष्ट्रीय बातमीपत्र आज ८ वाजून ३० मिनिटांनी प्रसारित होईल.

**<><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराला वेग आला आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि महागठबंधनच्या वरिष्ठ नेत्यांसह इतर पक्षांचे नेतेही प्रचाराच्या रणधुमाळीत उतरत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज औरंगाबाद आणि कैमूर जिल्ह्यांमध्ये दोन प्रचारसभा घेतील, तर भाजपा नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा जमुई आणि भागलपूर इथं सभा घेत आहेत, तसंच पूर्णिया इथं रोडशोमध्ये सहभागी होणार आहेत. तर, काँग्रेस नेते राहुल गांधी आज भागलपूर आणि बांका इथं सभा घेतील, तर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, गया आणि रोहतास इथं सभांना संबोधित करतील. महागठबंधनचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार तेजस्वी यादव आज पूर्णिया, अररिया, भागलपूर आणि बांका इथं १८ सभांना संबोधित करणार आहेत.

दरम्यान, बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात काल इतिहासात पहिल्यांदाच ६४ पूर्णांक ६६ शतांश टक्के इतकं विक्रमी मतदान झालं. या टप्प्यात एकंदर १ हजार ३१४ उमेदवारांचं राजकीय भवितव्य ईव्हीएममध्ये बंद झालं आहे.

**<><><><>**

सर्व शैक्षणिक संस्था, रुग्णालयं, सार्वजनिक क्रीडा संकुलं, बसस्थानकं, रेल्वेस्थानकं इत्यादी ठिकाणी भटकी कुत्री येऊ नयेत, यासाठी व्यवस्थित कुंपण घालण्यात यावं, असे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले. भटके कुत्रे चावण्याच्या घटनांमध्ये झालेली वाढ ही बाब काळजी करण्यासारखी असल्याचं निरीक्षण न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजरिया यांच्या पीठानं नोंदवलं. या सर्व ठिकाणांवरून भटकी कुत्री हटवण्याची आणि त्यांचं लसीकरण आणि निर्बीजीकरण करून त्यांना आश्रय केंद्रांमध्ये हलवण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची असल्याचंही न्यायालयानं सांगितलं. या ठिकाणांवरून उचललेली भटकी कुत्री पुन्हा त्याच ठिकाणी सोडण्यात येऊ नयेत, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं.

**<><><><>**

पोलीस आणि तपास यंत्रणांनी अटक करण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला अटकेची कारणं लेखी स्वरूपात लवकरात लवकर देणं बंधनकारक आहे, असा निकाल सर्वोच्च न्यायालयानं काल दिला. संबंधित व्यक्तीचा गुन्हा किंवा त्याच्या अटकेचे नियम किंवा कायदे कोणतेही असले, तरी अटक का केली, हे जाणून घेणं हा त्या व्यक्तीचा मूलभूत अधिकार असल्याचा

निर्वाळा सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ए. जी. मसीह यांच्या खंडपीठानं दिला. काही अपवादात्मक परिस्थितीत जर ही कारणं लेखी देणं शक्य नसेल, तर ती तोंडी सांगितली जावीत, त्यानंतरही योग्य कालमर्यादेच्या आत लेखी स्वरूपात कारणं दिली जावीत, असंही पीठानं सांगितलं.

**<><><><>**

भारतातल्या बँका एका दशकापूर्वीच्या तुलनेत आता खूप प्रगल्भतेनं काम करत आहेत, असं प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज दिली. भारतीय स्टेट बँकेच्या बँकिंग आणि आर्थिक विषयावरच्या परिषदेत ते मुंबईत बोलत होते. २०१८मध्ये तोट्यात असलेली बँक ते आज १०० कोटी अमेरिकी डॉलरची उलाढाल करणारी कंपनी हा भारतीय स्टेट बँकेचा प्रवास त्यांनी अधोरेखित केला. बँकिंग क्षेत्रासाठी आणलेल्या विविध नियमनांमुळे कर्जाच्या देवाणघेवाणीच्या प्रक्रियेत आमूलाग्र बदल झाल्याची ग्वाही मल्होत्रा यांनी दिली, तसंच आर्थिक स्थिरतेसाठी केलेल्या विविध नियमांचाही उल्लेख त्यांनी केला.

**<><><><>**

भारताचे अमेरिकेतले राजदूत विनय क्वात्रा यांनी काल वॉशिंग्टन इथं अमेरिकेचे दक्षिण आणि मध्य आशिया व्यवहार सहाय्यक परराष्ट्र मंत्री पॉल कपूर यांची भेट घेतली. या अधिकाऱ्यांनी दोन्ही देशातली भागीदारी आणखी दृढ करण्यासंबंधात तसंच सामायिक प्राधान्यक्रमांवर काम करण्याच्या मार्गांवर चर्चा केली. कपूर यांनी व्यापार, तंत्रज्ञान, ऊर्जा तसंच प्रादेशिक सुरक्षेसह अमेरिका आणि भारत यांच्यातले दृढ संबंध अधोरेखित केले.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत भेटीवर येण्याचे संकेत दिल्याच्या पार्श्वभूमीवर ही बैठक झाली आहे.

**<><><><>**

भारतीय हॉकीच्या गौरवशाली शतकपूर्तीनिमित्त आजपासून देशभरात विविध कार्यक्रम होत आहेत. या महोत्सवात देशभरातल्या साडेपाचशे जिल्ह्यांमध्ये हॉकीचे चौदाशेहून अधिक सामने खेळवले जाणार आहेत. नवी दिल्लीच्या मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडासंकुलात आज सकाळी झालेल्या मुख्य समारंभात स्पोर्ट्स मिनिस्टर्स इलेव्हन आणि हॉकी इंडिया इलेव्हन या संघात प्रदर्शनीय सामना खेळवण्यात आला. या सामन्यात केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू आणि इतर मान्यवर सहभागी झाले होते. भारतीय हॉकी संघाचे माजी खेळाडूही हा सामना पाहण्यासाठी उपस्थित होते. आठ ऑलिंपिक सुवर्ण पदकं जिंकलेल्या भारताला जगातल्या सर्वात यशस्वी हॉकी राष्ट्राचा दर्जा मिळालेला आहे.

**<><><><>**

सिडनी इथं सुरू असलेल्या एनएसडब्ल्यु खुल्या स्क्वॉश स्पर्धेत भारताच्या रथिका सुथंतिरा सीलन हिने उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. तिने उपांत्यपूर्व फेरीत ऑस्ट्रेलियाच्या कॅरन ब्लूम हिच्यावर ११-८, ११-७, ११-४ असा सरळ गेम्समध्ये विजय मिळवला.

**//<><><><>//**